2 AUG 2017 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कालानुरूप अभ्यासक्रमांचा समावेश करण्याचा शिवाजी विद्यापीठाचा निर्णय

प्रतिनिधी, कोल्हापूर

**कालानुरूप योग्य** ठरणाऱ्या अभ्यासक्रमांचा समावेश करण्याचा निर्णय बुधवारी झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत घेण्यात आला. कला, वाणिज्य, विज्ञान शाखेसाठी कौशल्य, कम्युनिटी आणि सॅटेलाईट सेंटर, खादी डिझाईन, ट्रॅव्हल अँड टुरिझम, ग्राफिक्स आणि गेमिंग डिझाईन, रिसर्च सेंटर, ई-कॉमर्स, ई-बँकिंग, बी. कॉम इन इन्शुरन्स, बीए. इन ब्रेल, बीकॉम ई कॉमर्स, एमएस्सी इन कर्बन ट्रेडिंग, सेंटर ऑफ एक्सलन्स यासह अन्य अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

विद्यापीठाचा नवीन कायदा झाल्यापासून शिवाजी विद्यापीठाची पहिली अधिसभा आज झाली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमानुसार बृहत आराखडा हा ३१ जुलैपर्यंत सादर करायचा असल्याने या सभेत विद्यापीठ अभ्यासक्रमात आणि महाविद्यालय प्रणालीत कोणते बदल करणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. शिवाजी विद्यापीठ हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे केंद्र मानले जाते . त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नव्या प्रवाहात समाविष्ट करणारे अभ्यासक्रम आखले जाणे अपेक्षित आहे.

त्यानुसार विचार करून कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतून नवीन अभ्यासक्रम सुरु केले जाणार आहेत . या संबंधीचा प्रस्ताव राज्य शिक्षण विभागाकडे पाठवण्यात येणार आहे . या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर विद्यापीठ अभ्यासक्रम सुरु करू शकेल, असे कुलगुरू देवानंद शिंदे यांनी सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक डॉ. महेश काकडे यांच्यासह अन्य सदस्य उपस्थित होते. उर्दू भाषेतून विज्ञान शाखा सुरु करण्यासाठी मानस आहे. तसेच जिल्हास्तरावर लोककला महाविद्यालय, तालुकास्तरावर महिला महाविद्यालयं आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी सॅटेलाईट सेंटर उभारण्याचा निर्णयही या वेळी घेण्यात आला .

F 2 AUG 2017
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णा भाऊंच्या साहित्याचे पुनर्वाचन करा

## लहू कानडे : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात तरुणांना आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे पुनर्वाचन आजच्या तरुणांनी करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन साहित्यिक लहू कानडे यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्रातर्फे अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यान ते बोलत होते. विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहातील या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक विज्ञान आणि कला विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील होत्या.

साहित्यिक लहू कानडे म्हणाले, आजचे तरुण समाजमाध्यमांद्वारे मत व्यक्त करीत आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. या व्यवस्थेचे रुपडे बदलण्यासाठी तरुणांना ही व्यवस्था आधी समजून घ्यावी लागेल. देशातील कष्टकरी जनतेमुळे अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे जतन झालेले आहे. अण्णांनी लावणी, पोवाडे, छटावणी, शाहिरी हे सर्व प्रामुख्याने कष्टकरी लोकांसाठी लिहिले आहे. साहित्यदरबारातील अण्णा भाऊंचा प्रवास अत्यंत कष्टदायक होता. अधिष्ठाता डॉ. भारती पाटील म्हणाल्या, तरुणांना चांगले



कोल्हापुरात मंगळवारी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्रातर्फे साहित्यिक लहू कानडे यांचे विशेष व्याख्यान झाले.

काम करण्यासाठी संघर्षाची प्रेरणा या अध्यासन केंद्राकडून मिळते. बहुजन समाजातील तरुणांमध्ये क्रांतीचे स्फुल्लिंग निर्माण करण्याचे कार्य या केंद्राकडून होईल.

कार्यक्रमावेळी रंगराव पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे विविध शाहिरीचे सादरीकरण केले. यावेळी अध्यासनाचे माजी समन्वयक डॉ. एम. एल. जाधव, आकाराम पाटील, डॉ. शरद गायकवाड, मेघा पानसरे, एस. एस. महाजन, आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

2 AUG 2017 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# व्यवस्था समजून घेतल्याशिवाय अण्णाभाऊ साठे समजणार नाहीत

## लहू कानडे; अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील नायक, नायिकांची पात्र बंडखोर, लढणारी आहेत. दुर्दैवाने आज व्यवस्था रूपडे बदलत असताना ढोंगीपणा वाढत चालला आहे. व्यवस्था नीट समजावून घेतल्याशिवाय अण्णाभाऊ साठे यांचा मोठेपणा समजणार नाही. अण्णाभाऊ साठे यांच्या कविता, साहित्यांचे पुनर्वाचन होणे काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन साहित्यिक, कवी लहू कानडे (अहमदनगर) यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील नियोजित साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्राच्यावतीने अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. भारती पाटील होत्या. कवी कानडे म्हणाले, सर्व समाजातील महापुरुषांनी जगण्याचा उन्नत जगण्याचा मार्ग दाखविल्यानेच त्यांचे स्मरण केले जाते. प्रत्येकजण जातिव्यवस्थेचा भाग असून खोटे बोलण्याची आज सक्ती केली जात आहे. साहित्यिक व कवींनी अण्णाभाऊ साठे यांचे जगणे जसेच्या तसे मांडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तरुणाई भरकटत चालली आहे असे म्हणत असताना त्यांच्यामधील फुलण्याच्या आविष्काराचे स्वागतही केले पाहिजे. त्यांना नेमकेपणाने मांडण्यात आपण कमी पडत आहोत.

अण्णाभाऊ साठे यांनी १९६० च्या दशकात संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या निमित्ताने सत्तेला हादरविले होते. त्याचप्रमाणे आज तरुणाई वाङ्मयातून ज्या पद्धतीने व्यक्त होत आहे, त्यामुळे समाजातील एक वर्ग हादरून गेला आहे. अण्णाभाऊ साठे आलेल्या परिस्थितीमधील संघर्ष, लढ्याला अभिवादन करून प्रेरणा घेण्यासारखे आहे. अण्णाभाऊ साठे लढत राहिले, त्यांनी अल्पशिक्षित, जगण्यासाठी संघर्ष करणाऱ्या सर्व वर्गातील लोकांचे दु:ख साहित्यातून मांडले. प्रारंभी शाहीर रंगराव पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी शाहिरीतून अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन केले. प्रा.डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी डॉ. एम. एल. जाधव, प्रा.डॉ. शरद गायकवाड यांच्यासह साहित्यिक, कवी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 AUG 2017

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात 'लेक वाचवा' चित्रप्रदर्शन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालयात प्रौढ निरंतर शिक्षण व विस्तारचे माजी संचालक डॉ. गोरखनाथ कांबळे यांच्या चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. 'लेक वाचवा' या विषयावर बोलक्या चित्रांतून त्यांनी मांडणी केली. मानवी भावभावना आणि एकूणच सामाजिक स्थितीवर या चित्रांच्या आणि त्याचजोडीला नेमक्या शब्दांचे उपदेश रेखाटले होते. यावेळी विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांची मोठी उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
2 AUG 2017 - महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवा विद्यापीठ कायदा आणि महिला



महाराष्ट्र शासनाने, अंमलात आणलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदयानुसार, विद्यापीठात विविध अधिकार मंडळे स्थापन करण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. यासाठी ऑनलाइन मतदार नोंदणी बंधनकारक आहे. या ऑनलाइन नोंदणीसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे जमा करणे आणि ती ऑनलाइन नोंदणी फॉर्मसोबत, सबंधित कार्यालयात जमा करणे या सर्व प्रक्रियेबाबतीत विद्यापीठ प्रशासन दक्ष आहे. या नवीन कायदयानुसार, निवडणूक आणि त्याचबरोबर 'नियुक्ती'ला महत्व आहे. तसेच आठ संचालकापैकी विद्यापीठ उप परिसर, नवसंशोधन, ज्ञान स्त्रोत केंद्र अशा नवीन पदांची भर पडली आहे. विद्यापीठ कायदयामध्ये स्त्री-पुरूष समानता व संवेदनशीलता या तत्वांना चालना देण्यासाठी महिला व समाजातील इतर दुर्बल घटकांना संधी याविषयी तरतूद करण्यात आली आहे. १९९४ च्या विद्यापीठ कायदयामध्ये महिलांच्या प्रतिनिधत्वाचा विचार करण्यात आलेला होता.

स्वातंत्र्यावेळी, उच्चशिक्षणातील महिलांचे प्रमाण हे दहा टक्के होते ते आता ४३.२५ टक्के इतके आहे. दर शंभर पुरूषांच्या मागे महिलांचे प्रमाण हे १४ टक्के इतके होते. ते आता ७६.३ टक्के इतके झाले आहे. देशामधील ८२ विद्यापीठे आणि १७७ महाविद्यालयांत स्त्री अभ्यास केंद्रे आहेत. महिलांच्या महाविद्यालयांची ३८६ ही विद्यापीठांची संख्या ही तुलनेने कमी असली तरी अशा विशेष शैक्षणिक संस्थाचे महत्वही आहे. महिला चळवळीतून तयार झालेल्या स्त्रीवादी महिला अभ्यासकांनी महिलांच्या शैक्षणिक दर्जा, त्यांना मिळणा-या संधी याविषयी नेहमीच भूमिका घेतलेली आहे. १९८६च्या शिक्षणाच्या राष्ट्रीय धोरणांमध्ये, नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये महिलांचा शैक्षणिक प्रशासनातील सहभाग, दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये 'जेंडर फ्रेंडली' वातावरण आणि अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये 'वूमेन कॅपासिटी बिल्डिंग इन हायर एज्युकेशन' यावर भर देण्यात आला. भारतातील महिलांच्या औपचारिक शिक्षणाची सुरूवात बंगालमध्ये १८१७ साली रॉबर्ट मे यांनी केली. ज्योतिराव आणि सावित्रीबाई फुले यांच्या योगदानामुळेच आज शिक्षणाच्या क्षेत्रात महिलांचे प्रमाण वाढत चालले असून, गुणवत्तेच्या निकषावर विद्यार्थ्यांनी धवल यश प्राप्त करताना दिसत आहेत. 'नॅक' या संस्थेनेही 'जेंडर ऑडिट' हा एक महत्वाचा निकष मानला आहे. नॅकच्या बदलत्या मार्गदर्शक तत्वांमध्येदेखील महिला सहभाग हा 'पॉलिसी, प्रॅक्टिस आणि प्रोसिजर' तिन्ही स्तरांवर आणला आहे. अभ्यासक्रमांध्ये महिलाच्या सबंधित विषयांना महत्व, संशोधन, ज्ञानाच्या प्रक्रियेत महिला प्राध्यापकांचा सहभाग, त्यांना मिळालेले पुरस्कार तसेच ग्रंथालयातील याविषयावरील ग्रंथसंपदा ,विशेष सोयी-सुविधा यांचेही मूल्यमापन होणार आहे. थोडक्यात महिलांचा उच्च शिक्षणातील सहभाग या महत्वाच्या निकषांची पूर्तता करणे आवश्यक ठरणार आहे.

आता येऊ घातलेल्या विद्यापीठीय निवडणुकीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ तरतुदींनुसार अधिसभेच्या म्हणजेच सिनेटसाठी असलेल्या एकूण ७६ जागांमध्ये विद्यापीठातील एकूण १८ पदाधिकारी वगळता ४१ हे निवडून येणारे तर १७ हे नियुक्त सदस्य असणार आहेत. यापैकी प्राचार्य , संस्था प्रतिनिधी, कुलपती नियुक्त , महाविद्यालयीन प्राध्यापक आणि पदव्युत्तर प्राध्यापक आणि पदवीधर यातून प्रत्येकी एक अशा सहा महिला येणार आहेत. याशिवाय इतर आरक्षित घटकांमध्ये त्यांना संधी दिल्यास ही संख्या नक्कीच वाढणार आहे. व्यवस्थापन परिषदेच्या एकूण २१ सदस्यांपैकी ७ विद्यापीठ पदाधिकारी वगळता १० निवडून येणारे व ४ नियुक्त सदस्य असणार आहेत. यापैकी मात्र महिलांसाठी राखीव जागा नाही. विद्या परिशद , अॅकॅडमीक कौन्सिल यासाठी विद्यापीठाचे बारा अधिकारी, निवडून येणारे आणि २० नियुक्त सदस्य यांचा समावेश असणार आहे. यामध्ये एकच महिला अशी तरतूद आहे. अभ्यास मंडळे आणि विद्याशाखा यामध्ये संधी दिल्यास महिला आत येऊ शकतात.

विद्यापीठाच्या निवडणुकांमध्ये जेथे महिलांसाठीच जागा राखीव आहेत, तेथे महिलांना प्रतिनिधित्व निश्चितच मिळणार यात शंकाच नाही. पण जेथे इतर आरक्षण आहेत किंवा खुल्या प्रवर्गातून महिलांचा विचार झाला तर अधिकार मंडळामध्ये महिलांची उपस्थिती प्रकर्षाने जाणवू शकेल. ऑनलाइन मतदार नोंदणीने होणारी ही पहिली निवडणूक असल्याने नेमके चित्र काय असेल याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू, प्रा. डॉ. देवानंद शिंदे सरांनी, विद्यापीठाची सूत्रे हातात घेतल्यापासून महिला प्राध्यापकांना विविध समित्यांमध्ये संधी देण्याचे निश्चित केले. त्यानुसार महिलांसाठी सर्वसमावेशक धोरणाची अंमलबजावणी होत आहे. ही खरोखरच अभिनंदनीय बाब आहे. महिलांमधील नेतृत्वगुणंचा विकास हा अशाच प्रकारच्या संधीने होतो. महाराष्ट्रात एक उत्तम विद्यापीठ म्हणून शिवाजी विद्यापीठ नावाजले जात असतानाच, महिलांचे सर्वसमावेशक धोरण राबवणारे राज्यातील पहिले विद्यापीठ म्हणून शिवाजी विद्यापीठ ठरावे असे वाटणे स्वाभाविक आहे.

● डॉ. निशा मुडे-पवार
nishapawar1968@rediffmail.com